# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230


क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/228 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 10 · 11 · 25

प्रति,

उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे सप्टेंबर 2025 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 62 मधील प्रशिक्षणार्थींचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले **कॅम्पा योजने** अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसीय व लिपीक / लेखपाल यांचे 45 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण व यासोबतच राज्य योजने अंतर्गत सुरु असलेले वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल यांचे 05 दिवसीय अल्प मुदत प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक **01/09/2025** ते **30/09/2025** पर्यंतचा मासीक शैक्षणीक अहवाल सोबत सहपत्रीत करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 1 ते 35 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
**वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.**

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
**वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.**

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण, व्यावसायिक** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 29/03/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र.** 62 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **कॅम्पा योजना अंतर्गत** दिनांक **04/08/2025 ते** 03/09/2025 या कालावधीमध्ये **वनपाल** यांचे 1 महिण्याचे **व 04/08/2025 ते** 17/09/2025 या कालावधीमध्ये **लिपीक / लेखापाल** यांचे **45** दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण एकुण **दोन** सत्रांमध्ये आयोजीत करण्यात आले. व यासोबतच **राज्य योजने** अंतर्गत **वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल** यांचे **5 दिवसीय अल्प मुदत** प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 09/09/2025 ते 13/09/2025 व 15/09/2025 ते 19/09/2025 ) या कालावधीमध्ये **एकुण 04 सत्रांमध्ये** आयोजीत करण्यात आले.

**दिनांक 01/09/2025 ते 30/09/2025** या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थीसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/09/2025 ते 30/09/2025** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.


हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक करणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र लेखी परीक्षा. ( दि. 29/08/2025 ते 05/09/2025 ) | 03 |
| 02 | कॅम्पा योजना अंतर्गत पदोन्न्त वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. (दि. 04/08/2025 ते 03/09/2025 ) | 04 ते 07 |
| 03 | कॅम्पा योजना अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. ( दि. 04/08/2025 ते 17/09/2025 ) | 08 ते 15 |
| 04 | राज्य योजने अंतर्गत लिपीक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 05 दिवसीय अल्प मुदत प्रशिक्षण कार्यक्रम (एकुण 04 सत्र माहे सप्टेंबर 2025) | 16 ते 21 |
| 05 | वन शहिद दिवस ( दि. 11/09/2025 ) | 22 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांची मौखीक परीक्षा. (दि. 11/09/2025 ) | 23 ते 24 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांची धाव स्पर्धा (दि. 12/09/2025 ) | 25 |
| 08 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा **PPT** सादरीकरण ( दि. 13/09/2025 ) | 26 |
| 09 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा सांस्कृतीक कार्यक्रम (दि. 16/09/2025 ) | 27 |
| 10 | केशव सीताराम ठाकरे यांची जयंती. ( दि. 17/09/2025 ) | 28 |
| 11 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा दीक्षांत समारंभ. (दि. 23/09/2025 ) | 29 ते 35 |

## 01. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 62 **द्वितीय सत्र लेखी परीक्षा**.

## ( **दि.** 29/08/2025 **ते** 05/09/2025 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 29/08/2025 ते 05/09/2025 या कालावधीमध्ये अप्रशिक्षीत वनरक्षक सत्र क्र. 62 मधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांची द्वितीय सत्राची लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले. एकूण 92 प्रशिक्षणार्थी या परीक्षेमध्ये सहभागी झाले. ही परीक्षा संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

परीक्षेचे वेळापत्रक पूर्वनियोजित पध्दतीने तयार करण्यात आले. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि नियमानुसार कार्यवाही करण्यात आली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. परीक्षेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार आढळून आला नाही. प्रशिक्षणार्थ्यांनीही अत्यंत सकारात्मक व शिस्तबध्द सहभाग नोंदवून परीक्षेला सहकार्य केले.


## 02. **कॅम्पा योजना अंतर्गत पदोन्नत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.( लेखी परीक्षा दि. 02/09/2025 )**






वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेल्या कॅम्पा योजने अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभुत प्रशिक्षण ( प्रशिक्षणाचा कालावधी दि.04/08/2025 ते 03/09/2025) या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेद्वारे प्रशिक्षणात दिलेल्या विषयांबाबत त्यांचे आकलन व प्रात्यक्षिक ज्ञान तपासण्यात आले. सदर लेखी परीक्षा ही **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनास घेण्यात आली.

# पदोन्नत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान विषय निहाय PPT सादरीकरण









# पदोन्नत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.

## ( प्रमाणपत्र वितरण समारंभ दि.03/09/2025 )









# पदोन्नत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण



प्रशिक्षणार्थींचे 30 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

## 03. कॅम्पा योजना अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. ( दि. 04/08/2025 ते 17/09/2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 02 दि. 04/08/25 ते 17/09/25** | **लिपीक/ लेखापाल** | 1. वनविभागातील विविध लेखाशिर्ष व त्यांची माहिती.<br>2. बिम्स प्रणाली.<br>3. बिल पोर्टल मेडीकल बिल, प्रवासभत्ता बिले.<br>4. सेवार्थ प्रणाली.<br>5. अर्थसंकल्प.<br>6. PFMS. | श्री. ए.बी. गेडाम, लिपीक, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा. | 20 |
| | | | 7. वेतन निश्चिती.<br>8. टिप्पणी लेखन व पत्र मसुदा.<br>9. निवृत्तीवेतन प्रकरणे तयार करणे.<br>10. निवृत्तीवेतन वेतनवाहिनी, वेतनीका, कोषवाहिनी.<br>11. शासकिय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे लाभ.<br>12. NPS/UPS.<br>13. शासकिय कर्मचाऱ्यांना मिळणारी अग्रिमे.<br>14. म.ना.से. ( वेतन ) नियम 1981 (वेतन निश्चिती).<br>15. सेवानिवृत्ती विषयक लाभ (Pensioner Benefits) i.e. Pension, DCRG, Leave Encampment, Pension Commutation, GPF, GIS.<br>16. म.ना.से. ( रजा ) नियम 1982 रजा लेखा तयार करणे.<br>17. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम 1998 लेखा तयार करणे. | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखा अधिकारी. रा. अमरावती. | |
| | | | 18. महाराष्ट्र कोषागार नियम.<br>19. महाराष्ट्र आकस्मीक खर्च, नियम.<br>20. मुंबई वित्तीय नियम व वित्तीय अधिकार.<br>21. भविष्य निर्वाह नियम.<br>22. अर्थसंकल्प.<br>23. भांडार, जडसंग्रह व निर्लेखन.<br>24. वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयके.<br>25. गटविमा योजना.<br>26. रोखपुस्तक.<br>27. महाराष्ट्र नागरी सेवा नियम. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)<br>28. स्थायित्व प्रमाणपत्र व स्वग्राम रजा प्रवास सवलत.<br>29. म.ना.से. (रुजु कालावधी)<br>30. न्यायालयीन प्रक्रिया व कामकाज. | श्री. विजय डहाळे, सहा. लेखा अधिकारी. रा. अमरावती. | |
| | | | 31. पदग्रहण अवधी, सेवापुस्तकात घ्यावयाच्या नोंदी.<br>32. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) 1981. | कु. वैशाली दुधे, लेखापाल. | |
| | | | 33. जंगल कामगार सहकारी संस्था, व त्यांचे कार्य.<br>34. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री. पी.एन. कैदलवार, वनमजुर, आलापल्ली. | |
| | | | 35. औषधी वनस्पती रानभाज्या व दुर्मिळ वनस्पती.<br>36. संस्थेतील औषधी व दुर्मिळ वनस्पतीची ओळख. | श्री. आर. बी. गिरी, वपअ.से.नि. | |
| | | | 37. भारतीय वन अधिनियम 1927.<br>38. वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 सुधारीत 2023.<br>39. महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन ) 1964 सुधारीत 2023.<br>40. वन्यप्राणी हल्याची नुकसान भरपाई प्रकरणे हाताळणे.<br>41. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम 2023 अंतर्गत प्रस्ताव.<br>42. वन गुन्हे प्रकरणी करावयाची कार्यवाही.<br>43. न्यायालयीन प्रकरणे हाताळतांना घ्यावयाची काळजी. | श्री. एस.एम. जगताप, विवअ. से.नि. | |
| | | | 44. NLP ओळख आणि महत्व. | श्री. एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 45. माहितीचा अधिकार अधिनियम 2005.<br>46. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) अधिनियम 2013. | प्रा. राजेश पाटील, रा. अमळनेर. | |
| | | | 47. महाराष्ट्र सेवा हमी कायदा व कार्यपध्दती.<br>48. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक ) नियम.<br>49. निलंबन - कारणे/ कार्यपध्दती/नियम.<br>50. विभागीय चौकशी, दोषारोप पत्र तयार करणे.<br>51. विभागीय चौकशी, सादरकर्ता अधिकारी नेमणूक व त्यांचे कर्तव्ये.<br>52. विभागीय चौकशी, पूर्व व चौकशी पुर्ततेनंतर कार्यवाही.<br>53. संवाद कौशल्य व अभिप्रेरणा.<br>54. वेळेचे महत्व, संघबांधणी.<br>55. JFM समितीचे रोखलेखा व त्याचे नियम.<br>56. नस्ती व्यवस्थापन व नस्ती व्यवस्थापनातील ABCD.<br>57. झिरो पेंडन्सी.<br>58. ऑडिट पॅरा लिहिणे व संपादीत करणे.<br>59. रोपवन मुल्यांकन अहवाल व आक्षेप पुर्तता.<br>60. How To Deal With People & Boss. | श्री. एस.बी. धर्माधिकारी सवस.से.नि. | |
| | | | 61. सेवार्थ प्रणाली. | श्री. नितेश होळकर, प्रशिक्षणार्थी. | |
| | | | 62. Self Awareness, Public Speaking & Presentation Skill.<br>63. Personality Development, Positive Attitude.<br>64. Communication Skill, Stress Management.<br>65. Time Management, Conflict Management, Emotional Intelligence. | श्री. रागीब अहमद, तज्ञ, व्य.वि. | |
| | | | 66. E-Auction.<br>67. Personal Hygiene. | कु. अरुना राठोड, प्रशिक्षणार्थी. | |
| | | | 68. सेवा जेष्ठता, आकृतीबंध, बिंदूनामावली.<br>69. E-Tender.<br>70. सहा गठ्ठे पध्दती.<br>71. वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती.<br>72. रोकडवही मार्गदर्शक सुचना.<br>73. भांडार, खरेदी प्रक्रिया.<br>74. शंका व निरसन.<br>75. कार्यालयीन कामकाज पध्दती. | श्री. जी. टी. महाजन, लेखाधिकारी से.नि. | |
| | | | 76. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री. एस.एस. बिजागरे, लेखापाल, से.नि. | |
| | | | 77. डिजिटल डॉक्युमेंट आणि कम्युनिकेशन मॅनेजमेंट, ई-मेल व्यवस्थापन व व्हॉट्सॲप दस्ताऐवज व्यवस्थापन.<br>78. सॉप्ट कॉपींचे व्यवस्थापन, क्लाऊड स्टोरजचा वापर व स्पीच-टू-टेक्स्ट.<br>79. गुगल शीट्सचा वापर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चा वापर व मेल अर्ज.<br>80. एम एस एक्सेल चा वापर व गुगल फॉर्म्सचा वापर. | श्री. आनंद ढगे, सिपना, महाविद्यालय, चिखलदरा. | |
| | | | 81. विषय निहाय PPT सादरीकरण. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे (संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा) | |
| | | | 82. क्षेत्रीय दौरा. | श्री. गुल्हाने सर, से.नि. उपसंचालक. | |
| | | | | **एकुण प्रशिक्षणार्थी** | 20 |

# लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.







# लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण शैक्षणिक दौरा.







लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.






## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान PPT सादरीकरण.










**लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. (NLP Session / योगा परेड )**







## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.







प्रशिक्षणार्थींचे 45 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **मा. संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

## 04. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे राज्य योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 5 दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ( माहे सप्टेंबर 2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 07 दि. 09/09/25 ते 13/09/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषयः वनगुन्हे शोध, तपास व कार्यपध्दती.**<br>1.Crime Detection मध्ये Cyber Cell चे महत्व. | श्री. आकाश सारडा, वनरक्षक, अमरावती वनविभाग. | **26** |
| | | | 2. Wildlife Forensic Science. | श्री. डॉ. सुजीत, WRTC, नागपूर. | |
| | | | 3. Wildlife Protection Act-1972 व सुधारणा 2022.<br>4. BNSS, BSA, BNS मधील आवश्यक तरतुदी.<br>5. भारतीय वन कायदा 1927 व जन विश्वास कायदा 2023.<br>6. महाराष्ट्र वन नियमावली 2014.<br>7. FRA तरतुदी.<br>8. वनगुन्हे शोध, तपास व कार्यपध्दती. | श्री.एस.एम. जगताप, ( वि.व.अ.से.नि.) | |
| 02 | **सत्र क्र. 08 दि. 09/09/25 ते 13/09/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषयः वन्यजीव व्यवस्थापन, मानव वन्यजीव संघर्ष व उपाय.**<br>1. वन्यजीव व्याख्या, ओळख व महत्व.<br>2. भारतीय वन्यजीव संपदा.<br>3. वन्यजीव स्वभाव, वागणूक व अस्तित्व पुरावे.<br>4. वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन.<br>5. वन्यप्राणी प्रगणना.<br>6. अधिवास व्यवस्थापन.<br>7. मानव वन्यजीव संघर्ष व उपाययोजना.<br>8. चर्चासत्र.<br>9. शंकानिरासन.<br>10. सत्र आढावा व मुल्यांकन. | श्री. अ.मा. पिलारीसेठ वि.व.अ. (से.नि.) | **29** |
| 03 | **सत्र क्र. 09 दि. 15/09/25 ते 19/09/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषयः रोपवन व रोपवाटीका तंत्र.**<br>1. विषय ओळख, उद्देश, आवश्यकता व प्रकार.<br>2. जागा निवड कार्य आयोजना, सं.व.व्य. कार्यक्रम ई. अनुषंगाने जागा निवड.<br>3. सर्व्हेक्षण सिमांकन.<br>4. जागेचे जिओ टॅगींग.<br>5. ग्रीड आखणी.<br>6. GPS च्या सहाय्याने उपचार नकाशा.<br>7. पुर्व पावसाळी कामे, झोन निहाय करावयाची कामे त्यांचे आकारमान.<br>8. विविध नमुने.<br>9. रोपवन नमुना नुसार खडगे / चर आखणी.<br>10. झोन 1 मधील मृद संधारण कामे.<br>11. पुर्व पावसाळी कामांचे मोजमाप पुस्तक.<br>12. रोपवन निर्मितीच्या विविध पायऱ्या.<br>13. प्रथम वर्षीय कामे.<br>14. रोपवन नमुने.<br>15. अंदाजपत्रकांचा सखोल अभ्यास.<br>16. बाब निहाय तरतूद.<br>17. रोपवन नमुना निहाय अंदाजपत्रकीय अभ्यास.<br>18. मियावाकी रोपवन.<br>19. यशस्वी रोपवनाची सप्तसुत्री व चर्चा.<br>20. रोपवाटिका आवश्यकता.<br>21. प्रकार, जागा निवड, आराखडा, पिशवी आकारानूसार | श्री. भालेराव, सहा. वनसंरक्षक, ( से.नि.) | **32** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र आवश्यकता.<br>22. वाफे प्रकार, आखणी, बीज संकलन.<br>23. बी उपचार, बी पेरणी, पिशव्या भरणे, मिश्रण.<br>24. बी पेरणी, ट्रान्सप्लांटींग, देखभाल.<br>25. रुट ट्रेनर.<br>26. कपोस्ट खत, गांडूळ खत निर्मिती.<br>27. रोपवाटीका तयार करणे.<br>28. प्रत्यक्ष रोपवाटिका तयार करणे, पध्दतींचा अभ्यास.<br>29. प्रकल्प अंमलबजावणी अंदाजपत्रक.<br>30. कामांची अंमलबजावणी, परिणाम मोजणी. | | |
| 04 | **सत्र क्र. 10**<br>**दि. 15/09/25**<br>**ते 19/09/25** | **लिपिक / लेखापाल** | **विषय: महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील, रजा व वेतन नियम.** | | 25 |
| | | | 1. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा) )सर्व साधारण रजा-1,2) (रजा लेखा-1) (विशेष रजा-1,2)(रजा प्रात्यक्षिक) (शंका व समाधान) (शिस्त व अपील-1,2 ) (विभागीय चौकशी इ.) (शिस्त व अपील-शंका समाधान) | श्री. विजय डहाळे,<br>सहा. लेखा अधिकारी.<br>रा. अमरावती. | |
| | | | 2. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) (मुळ नियम) (5 वे व 6 वे व 7 वे वेतन आयोग व प्रात्यक्षिक) | श्री. ओमप्रकाश जाधव.<br>सहा. लेखा अधिकारी<br>रा. अमरावती. | |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी** | | | | 112 |

वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 07 ( दि. 09/09/2025 ते 13/09/2025 )
विषय: वनगुन्हे शोध, तपास व कार्यपध्दती.







प्रशिक्षणार्थींचे पाच दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **सत्र संचालक, कु. मनीषा आर. मगर्दे**, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 08 ( दि. 09/09/2025 ते 13/09/2025 )**
**विषय: वन्यजीव व्यवस्थापन, मानव वन्यजीव संघर्ष व उपाय.**








प्रशिक्षणार्थींचे पाच दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **सत्र संचालक, कु. मनीषा आर. मगर्दे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र.** 09 ( **दि.** 15/09/2025 **ते** 19/09/2025 )

**विषय: रोपवन व रोपवाटीका तंत्र.**










प्रशिक्षणार्थींचे पाच दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**लिपिक / लेखापाल प्रशिक्षण सत्र क्र. 10 ( दि. 15/09/2025 ते 19/09/2025)**

**विषय: महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील, रजा व वेतन नियम.**










प्रशिक्षणार्थींचे पाच दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

## 05. **वन शहिद दिवस** ( **दि.** 11/09/2025 )









वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि.** 11/09/2025 रोजी वन शहीद दिवस अत्यंत श्रध्दा आणि सन्मानपूर्वक **संचालक,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने **वृक्ष लागवड** करुन शहीद वनकर्मचाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आणि पर्यावरण संरक्षणासाठी कटिबध्द राहण्याची शपथ घेतली.

## 06. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांची मौखीक परीक्षा. ( दि. 11/09/2025 )







वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 मधील प्रशिक्षणार्थी यांची मौखीक परीक्षा दि. 11/09/2025 रोजी घेण्यात आली.

सर्वप्रथम, प्रशिक्षणार्थींची लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेत प्रशिक्षणार्थींना सैध्दांतिक ज्ञानाची चाचणी देण्यात आली. वनस्पती, प्राणी, वनसंपदा, कायदे आणि नियम या विषयांवरील माहितीवर विशेष भर देण्यात आला. लेखी परीक्षेतून प्रशिक्षणार्थींच्या विषयातील गहन समज आणि माहितीची पातळी तपासण्यात आली.

लेखी परीक्षे सोबत, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष कामकाजात आपली क्षमता सिध्द करणे आवश्यक होते. जंगलातील पथदर्शक, निरीक्षण, रेकॉर्ड ठेवणे, संरक्षणात्मक उपाय योजना इत्यादी कौशल्यांचे मूल्यमापन केले गेले. प्रात्यक्षिक परीक्षेचा उद्देश प्रशिक्षणार्थींच्या व्यावहारिक अनुभव आणि कौशल्याची पडताळणी करणे हा होता.




लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांनंतर, प्रशिक्षणार्थींची **मौखीक परीक्षा** आयोजित केली गेली. या परीक्षेत प्रशिक्षणार्थींच्या ज्ञानाची, संवादकौशल्याची, आचारविचाराची आणि व्यावहारिक माहितीची तपासणी करण्यात आली. प्रशिक्षकांनी मौखीक परीक्षेतून त्यांच्या निर्णयक्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि एकूण प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासली.

संपुर्ण सत्रात प्रशिक्षणार्थींच्या सर्वांगीण विकासावर भर दिला गेला. या प्रशिक्षणातून ते नवे ज्ञान आत्मसात करून वनरक्षक म्हणून कार्य करण्यास सक्षम झाले आहेत.

लेखी, प्रात्यक्षिक आणि मौखीक परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यामुळे सत्र क्र. 62 चे प्रशिक्षणार्थी पुढील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सज्ज आहेत.

सदर मौखीक परीक्षा ही **संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

**07. नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांची 5 कि.मी. धावण्याची स्पर्धा. ( दि. 12/09/2025 )**





वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 62 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांमध्ये 5 कि.मी. धाव स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्दिष्ट प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक तयारी यांचे मूल्यमापन करणे होते.

धाव स्पर्धेसाठी प्रशिक्षणार्थींना नियोजित मार्गावर धावण्यास सांगितले गेले. सर्व प्रशिक्षणार्थींनी उत्साहाने आणि पूर्ण प्रयत्न करून या धाव स्पर्धेत सहभाग घेतला. प्रशिक्षकांनी धाववेग, शिस्त, सहनशक्ती आणि प्रशिक्षणार्थींचा संघटनात्मक अनुभव यांचा बारकाईने अवलोकन केला.

धाव स्पर्धेच्या निकालांनुसार, प्रशिक्षणार्थ्यांचे शारीरिक तंदुरुस्तीचे स्तर तसेच मानसिक तयारीचा अंदाज घेता आला. ही स्पर्धा प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाची ठरली आणि त्यांना भविष्यातील व्यावहारिक कार्यासाठी सज्ज करण्यास मदत झाली. सदर धाव स्पर्धा ही **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री.एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

**08. नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा Power Point Presentation सादरीकरण. ( दि. 13/09/2025 )**



वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 62 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात प्रथम सत्र परीक्षा तसेच दुसऱ्या टप्प्यात द्वितीय सत्र परीक्षा घेण्यात आल्या. या दोन्ही परीक्षांनंतर प्रशिक्षणार्थींची मौखिक परीक्षा घेण्यात आली. वरील सर्व परीक्षांनंतर प्रशिक्षणार्थींकडून त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा आढावा घेण्यासाठी **Power Point Presentation** सादरीकरण आयोजित करण्यात आले.

सदर सादरीकरणादरम्यान प्रशिक्षणार्थींनी वनव्यवस्थापन, वनसंवर्धन, वनसंरक्षण तसेच शासकीय कर्तव्यपालन या संदर्भातील ज्ञान व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.

सदर Power Point Presentation सादरीकरण **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी घेतले. **संचालक,** यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थींनी उत्कृष्ट सादरीकरण करुन प्रशिक्षणादरम्यान प्राप्त ज्ञान व कौशल्य प्रभावीपणे मांडले.

## 09. नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा सांस्कृतीक कार्यक्रम. ( दि. 16/09/2025 )









वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 62 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असुन या कार्यक्रमास **संचालक,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सत्र संचालक, कु. मनीषा आर. मगर्दे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री.एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा हे सुध्दा या कार्यक्रमात उपस्थित होते.

10. **केशव सीताराम ठाकरे यांची जयंती**. ( **दि**. 17/09/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि.17/09/2025 रोजी **केशव सीताराम ठाकरे** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते साजरी करण्यात आली.

**परिचय**: केशव सीताराम ठाकरे, ज्यांना आपण (प्रबोधनकार ठाकरे म्हणून ओळखतो, हे महाराष्ट्राचे प्रसिध्द समाजसुधारक, पत्रकार, लेखक आणि विचारवंत होते. त्यांचा जन्म 17 सप्टेंबर 1885 रोजी झाला आणि निधन 20 नोव्हेंबर 1973 रोजी झाले. ते महाराष्ट्रातील स्वाभिमान जागवणाऱ्या चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व होते.

**जन्म व शिक्षण** :

**जन्म**: 17 सप्टेंबर 1858, पनवेल (जि. रायगड, महाराष्ट्र)

**मूळ गाव**: भिवंडी परिसरातील ठाकरे कुटुंब.

**शिक्षण**: त्यांचे शिक्षण मर्यादित होते, पण स्वअभ्यास, वाचन आणि सामाजिक जाण यांच्या बळावर त्यांनी स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवले.

**सामाजिक आणि पत्रकारितेतील कार्य**:

- केशव सीताराम ठाकरे यांनी **" प्रबोधन "** हे साप्ताहिक सुरु केले. त्यातून त्यांनी समाजातील अंधश्रध्दा, जातीभेद, अन्याय आणि रुढी याविरोधात जनजागृती केली.
- त्यांनी **" सामाजिक प्रबोधन ", " जातिनिर्मूलन ", " हिंदू धर्मातील सुधारणा "** आणि **" राष्ट्रीय एकात्मता "** यांवर अनेक लेख लिहिले.
- ते **संत तुकाराम, फुले, आंबेडकर** आणि **शिवाजी महाराज** यांच्या विचारांनी प्रेरित होते.
- त्यांनी समाजातील नीच मानल्या जाणाऱ्या घटकांसाठी समान हक्क आणि सन्मान यासाठी संघर्ष केला.

11. **नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम**.






वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी **क्र**. 62 कालावधी **दिनांक** 29/03/2025 **ते** 24/09/2025 यांनी आपले सहा महिने पायाभूत कालावधी प्रशिक्षण पूर्ण केले असुन सदर प्रशिक्षणार्थीचा प्रमाणपत्र वितरण व दिक्षांत समारंभ कार्यक्रम **दि**. 23/09/2025 **रोजी** घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे **अध्यक्ष मा.श्री.संजीव गौड.(भा.व.से)** प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर व कार्यक्रमाचे **विशेष उपस्थिती** म्हणुन उपस्थित असलेले अतीथी **मा.श्री.के. अर्जुना** (भा.व.से) उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती व **मा. श्रीमती किर्ती जमदाडे (कोकाटे)** (भा.व.से.) उपवनसंरक्षक, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा व **श्री. सी. गणेशन,** (भा.व.से.) उपवनसंरक्षक, अमरावती व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठचे अध्यक्ष **श्री. डॉ. इंगोले,** व तसेच सदर कार्यक्रमाचे **विनीत** म्हणुन उपस्थित **कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** (म.व.से) संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व तसेच या कार्यक्रमाला उपस्थीत कु. मनीषा आर. मगर्दे, सत्र संचालक (01), वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व कु. प्राची उराडे, सत्र संचालक (02), वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम हा पार पाडण्यात आला.

## वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.








# वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.









## संस्थेतील ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले. ( दि. 23/09/2025 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी **क्र.** 62 कालावधी **दिनांक** 29/03/2025 **ते** 24/09/2025 यांनी आपले सहा महिने पायाभूत कालावधी प्रशिक्षण पूर्ण केले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण व दिक्षांत समारंभ कार्यक्रम **दि.** 23/09/2025 **रोजी** घेण्यात आला व यासोबतच सदर कार्यक्रमाचे **अध्यक्ष मा.श्री.संजीव गौड.(भा.व.से)** प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांच्या हस्ते संस्थेतील **ओपन जिमचे उद्घाटन** करण्यात आले.

संस्थेतील ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले. ( दि. 23/09/2025 )







# वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.





वनसंपदेचं रक्षण, पर्यावरणाचं संवर्धन आणि निसर्गाची सुरक्षा करण्याची शपथ घेऊन आज वनसेवेच्या नव्या पिढीने वन प्रशिक्षण संस्थेत दीक्षांत सोहळ्यातून वनसेवेच्या नव्या प्रवासाची सुरुवात केली. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक सत्र क्र. 62 यांचा पासिंग आऊट सोहळा अत्यंत थाटात पार पडला.

नवे वनसैनिक निसर्गरक्षणसाठी सज्ज झाले असून, त्यांच्या शिस्तबध्द पावलांनी परेड मैदान परिसर दुमदुमला. **मा.श्री.संजीव गौड.(भा.व.से)** प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना **मा.श्री.संजीव गौड**, यांनी खरा वनरक्षक कोण असतो ? या प्रश्नाला भिडत अत्यंत मार्मिक विचार मांडले. वनरक्षक हा फक्त जंगलाचा पहारेकरी नसून, तो प्रकृतीचा रक्षक, वन्यजीवांचा संरक्षक आणि पर्यावरणाचा खरा सेवक आहे. **मा.श्री.संजीव गौड**, यांनी आपल्या दीर्घ अनुभवातून भावी वनरक्षकांना कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा दिली. गणवेशाचे महत्त्व नमूद करत त्यांनी कर्तव्य कठीण असले तरी त्यात समाधान अधिक आहे. असे सांगत प्रशिक्षणार्थ्यांमध्ये सेवा, शिस्त आणि समर्पणाचे बीज पेरले.

